डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१
दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६००/२६३३३३३०/२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

जा.क्र/बार्टी-पुणे/BANRF- अधिछात्रवृत्ती/२०२४-२५/ ३६५२ दिनांक २/०८/२०२४

## परिपत्रक

### विषय: डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण (बार्टी), पुणे मार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती -२०२२ च्या प्रक्रीयेकरीता मूळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रांची पडताळणी करण्याकरीता उपस्थित राहणेबाबत.

उपरोक्त विषयांन्वये आपणास कळविण्यात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती -२०२२ करिता अर्ज केलेल्या उमेदवारांनी आपल्या मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे पडताळणी करण्याकरीता खालील नमूद दिनांकास उपस्थित राहणे आवश्यक आहे.

१) दि. ७/०८/२०२४ ते दि. २१/०८/२०२४ या कालावधीत मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे घेऊन उपस्थित रहावे, सदर कागदपत्रांची तपासणी खालीलप्रमाणे दिलेल्या नियोजित अनुसूचीप्रमाणे करण्यात येणार आहे.

| अनु.क्र | दिनांक | तपासणी करीता उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी | तपासणी टेबल क्रमांक | एकूण विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | ०७/०८/२०२४ बुधवार | यादी क्रमांक १- अनु ०१- १२५ | अनु. क्र. १ ते ४१ टेबल क्रमांक १ | एकूण विद्यार्थी १२५ |
| | | | अनु. क्र. ४२ ते ८२ टेबल क्रमांक २ | |
| | | | अनु. क्र. ८३ ते १२५ टेबल क्रमांक ३ | |
| २ | ०८/०८/२०२४ गुरुवार | यादी क्रमांक २- अनु १२६- २५० | अनु. क्र. १२६ ते १६५ टेबल क्रमांक १ | एकूण विद्यार्थी १२५ |
| | | | अनु. क्र. १६६ ते २०५ टेबल क्रमांक २ | |
| | | | अनु. क्र. २०६ ते २५० टेबल क्रमांक ३ | |
| ३ | ०९/०८/२०२४ शुक्रवार | यादी क्रमांक ३ - अनु २५१ -३७५ | अनु. क्र. २५१ ते २९० टेबल क्रमांक १ | एकूण विद्यार्थी १२५ |
| | | | अनु. क्र. २९१ ते ३३० टेबल क्रमांक २ | |
| | | | अनु. क्र. ३३१ ते ३७५ टेबल क्रमांक ३ | |
| ४ | १२/०८/२०२४ समोवार | यादी क्रमांक ४- अनु ३७६- ५०० | अनु. क्र. ३७६ ते ४१५ टेबल क्रमांक १ | एकूण विद्यार्थी १२५ |
| | | | अनु. क्र. ४१६ ते ४५५ टेबल क्रमांक २ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | अनु. क्र. ४५६ ते ५००<br>टेबल क्रमांक ३ | |
| ५ | १३/०८/२०२४<br>मंगळवार | यादी क्रमांक ५- अनु ५०१- ६२५ | अनु. क्र. ५०१ ते ५४०<br>टेबल क्रमांक १ | एकूण विद्यार्थी १२५ |
| | | | अनु. क्र. ५४१ ते ५८२<br>टेबल क्रमांक २ | |
| | | | अनु. क्र. ५८३ ते ६५२<br>टेबल क्रमांक ३ | |
| ६ | १४/०८/२०२४<br>बुधवार | यादी क्रमांक ६- अनु ६२६-७६३ | अनु. क्र. ६२६ ते ६६५<br>टेबल क्रमांक १ | एकूण विद्यार्थी १२५ |
| | | | अनु. क्र. ६६६ ते ७०५<br>टेबल क्रमांक २ | |
| | | | अनु. क्र. ७०६ ते ७६३<br>टेबल क्रमांक ३ | |
| ***टीप: दिनांक १९/०८/२०२४ ते २१/०८/२०२४ या कालावधी मध्ये ज्या विद्यार्थ्यांचे कागदपत्र पडताळणी दरम्यान अपूर्ण कागदपत्र सादर केले असतील त्यांनी उपरोक्त नमूद कालावधी मध्ये त्यांचे मूळ कागदपत्र बार्टी कार्यालयास प्रत्यक्ष येऊन सादर करावे.** | | | | |

२) BANRF-२०२२ अंतर्गत अर्ज केलेल्या उमेदवारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, "(बार्टी) पुणे जुने सर्किट हाऊस, २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प पुणे-४११००१ या पत्यावर सकाळी ठीक १०.३० वाजेपासून ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यत दिलेल्या दिनांकाप्रमाणे प्रत्यक्ष मूळ प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणी करीता उपस्थित राहणे आवश्यक आहे.

३) ज्या मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रांची पडताळणी करावयाची आहे त्या कागदपत्रांची यादी सोबत जोडण्यात आलेली आहे तसेच अर्जाची प्रत सोबत आणावी.

४) अर्जाची प्रत व मूळ कागदपत्रांच्या झेरॉक्स स्वयं साक्षांकित करून सादर करावी, केवळ प्रतिज्ञापत्र मा. कार्यकारी दंडाधिकारी यांच्या कोर्टातून Affidavit करून मूळ प्रतीत सोबत सादर करावे. तसेच सोबत देण्यात आलेल्या Cover Page (Annexure- II see attachment) व प्रपत्र ब (see attachment) डाऊनलोडकरून मूळ प्रतीत सादर करावे.

५) ज्या क्रमाने यादीतील प्रमाणपत्रे /कागदपत्रे मागविली आहेत, त्याच क्रमाने मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे पडताळनी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दाखवावीत, जेणेकरून वेळेत कार्यवाही पूर्ण करता येईल.

६) मूळ कागदपत्र पडताळणी करीता बार्टी, पुणे कार्यालय येथे पोहचल्या नंतर प्रथम आपण आपली नोंद करून घ्यावी नोंदणी केलेल्या क्रमाने कार्यवाही करण्यात येईल.

७) कागदपत्रांची पडताळणी करतांना अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याशी कोणताही वाद घालू नये, कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा शंका असल्यास मा. विभाग प्रमुख किंवा प्रकल्प व्यवस्थापक यांच्याशी भेटून आपली शंका किंवा समस्या दूर करावी.

८) आपल्या अर्जात कोणत्याही प्रकारची दुरुस्ती असेल तर आपण ती मूळ कागदपत्रांची तपासणी करताना संबंधित अधिकारी – कर्मचारी यांना सदर बाब निदर्शनास आणून द्यावी व दुरुस्ती करून घ्यावी.

९) कोणतेही मूळ कागदपत्र जमा करून नये, उमेदवारांनी आपल्या मूळ कागदपत्रांची काळजी स्वत: घ्यावी, कागदपत्रे गहाळ झाल्यास बार्टी कार्यालय यांस जबाबदार राहणार नाही.

१०) ज्या महिला उमेदवार गर्भवती असतील, अशा महिला उमेदवारांनी bartifellowship2023@gmail.com या इमेल-आयडी वर अनुउपस्थितीचा अर्ज डॉक्टरांच्या आवश्यक प्रमाणपत्रासह सादर करावा, अश्या उमेदवार आपल्या पालक किंवा प्रतिनिधीमार्फत कागदपत्रे पाठवून पडताळणी करून घेण्यास हरकत नाही

११) कागदपत्र पडताळणी करीता कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च/भत्ता या कार्यालयाकडून देण्यात येणार नाही

१२) **मूळ कागदपत्र पडताळणी करीता उपस्थित नसणाऱ्या किंवा आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न करणाऱ्या उमेदवारांचा अर्ज रद्द करण्यात येईल याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

१३) मूळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रांची पडताळणी झाल्यावरच विहित नियमानुसार पात्रता व अपात्रता ठरविण्यात येईल

१४) मा. अमुस (वित्त) यांच्या कायमस्वरूपी समितीने दिलेल्या निर्देशाचे पालन वेळोवेळी करणे विद्यार्थ्यांना बंधनकारक राहील.

आपल्या काही शंका असल्यास बार्टी, पुणे संस्थेच्या दूरध्वनीवर संपर्क करावा.

-स्वा-<br>
महासंचालक<br>
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था<br>
(बार्टी), २८, क्वीन्स गार्डन, पुणे ४११००१.

प्रतिलिपी:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF-२०२२) चे कागदपत्र पडताळणी करीता पात्र उमेदवार